धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
राजन राजे

संदर्भ क्र.________________ दिनांक : ११/१२/२०१४

प्रसिध्दीकरिता

# दलितांवर अत्याचार करणाऱ्यांना फाशी द्या - राजन राजे

**प्रतिनिधी**

दि. ११ - खैरलांजी-खर्डा-नगरमधील घटनांवरून दिसतेय की, दलितांवर **'दलित'** म्हणून अत्याचार करण्यात आलेत. दलितांवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना फाशीची शिक्षाच व्हायला हवी, असे परखड मत **'धर्मराज्य पक्षा'**चे अध्यक्ष **राजन राजे** यांनी व्यक्त केले.

आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिनानिमित्त धुरू हॉल, दादर येथे आयोजित **'जाहीर परिसंवादा'**त अध्यक्षस्थानावरून बोलताना **राजन राजे** यांनी वरील मत व्यक्त केले. यावेळी **'कलमनामा'** या साप्ताहिकाचे संपादक, प्रसिध्द पत्रकार युवराज मोहिते, दलित अत्याचारविरोधी समितीचे अध्यक्ष सुबोध मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

ग्रामिण भागात जातीच्या नावाखाली होत असलेले अत्याचार हा काहीजणांना हक्कच वाटतो. काँग्रेस-राष्ट्रवादी-भाजप-शिवसेना-मनसे आदी प्रस्थापित राजकीय पक्षांचे नेतेच कंत्राटदार झालेत आणि ते कंत्राटदारपध्दतीच्या मार्फत दलित-आगरी-कोळी या बहुजन समाजातील तरूणांची राजरोसपणे पिळवणूक करीत आहेत. कंत्राटी पध्दतीच्या या नव-अस्पृश्यतेविरोधात आणि किमान २५ हजार रूपये महिन्याच्या वेतनासाठी त्वेषाने लढायला हवे. मानव आणि निसर्गाचं शोषण थांबविण्यासाठी **'मानवी हक्क दिना'**च्या निमित्ताने संकल्प करण्याची गरज **राजन राजे** यांनी प्रतिपादन केली.

प्रसिध्द पत्रकार युवरात मोहिते यांनी शिवछत्रपतींचा आदर्श ठेवून मानवतेसाठी झगडण्याची गरज व्यक्त केली, तर सुबोध मोरे यांनी महाराष्ट्रातील दलित अत्याचाराच्या घटनांची जंत्रीच सादर केली. 'धर्मराज्य पक्षा'चे महासचिव राजू फणसे यांनी जात-धर्माच्या पलिकडे पाहून सर्वांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे म्हटले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन धर्मराज्य पक्षाचे महासचिव, पत्रकार अनिल ठाणेकर यांनी केले. यावेळी **'धर्मराज्य पक्षा'**चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे, राजू सावंत, मुंबई संपर्कप्रमुख प्रविण तामसे, धर्मराज्य महिला संघटनेच्या अध्यक्षा जयश्री पंडित, धर्मराज्य कर्मचारी-महासंघाचे उपाध्यक्ष रमाकांत नेवरेकर, सचिव रूपेश पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

ए/ए२०३, 'पांचजन्य'-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस्
को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२,
ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, 'पांचजन्य', शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग,
द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०.
दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००

*"सर्व सामान्यांचं जीवन-मरण आणि पर्यावरण, हवं एवढयासाठीच राजकारण!"...*